असा. क्र. २१ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शनिवार, मे ५, २००७/वैशाख १५, शके १९२९**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

पृष्ठे

**सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.—** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. .. .. .. .. २०४-२०५

दिनांक ५ मे २००७ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

**सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.**

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर “ **महाराष्ट्र शासन राजपत्रात** ” दिनांक ५ मे २००७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

१९६६ चा महा. ४१. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अधिनियम, २००७ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, दिनांक १ ऑगस्ट २००७ रोजी अंमलात येईल.



**[किंमत :** रुपये ९.००]

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४२ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त संहिता " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ४२ ला त्याचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल आणि अशा प्रकारे नवीन क्रमांक देण्यात आलेल्या उक्त पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :— १९६६ चा महा. ४१.

" (२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, खालील क्षेत्रे वगळता, नगरेतर क्षेत्रातील शेतीसाठी उपयोग करण्यात येणाऱ्या कोणत्याही जमिनीचे वैयक्तिक खऱ्याखुऱ्या निवासी प्रयोजनात रूपांतर करण्यासाठी अशा परवानगीची आवश्यकता असणार नाही,—

(क) कलम ४७क च्या स्पष्टीकरणामधील खंड (२) मध्ये, महानगरपालिकेचे किंवा नगरपरिषदेचे परिसर क्षेत्र म्हणून निर्देशित करण्यात आलेले क्षेत्र ;

(ख) राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, जिल्हा रस्ते किंवा गाव रस्ते यांच्या नियंत्रण रेषेच्या आत असलेली क्षेत्रे ;

(ग) भारत सरकारकडून पर्यावरण-संवेदनशील क्षेत्र (Eco-sensitive Zone) म्हणून अधिसूचित केलेले क्षेत्र. ".

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४४ ची सुधारणा.

**३.** उक्त संहितेच्या कलम ४४ मध्ये, पोट-कलम (१) मधील, " (अ) ज्या जमिनीची आकारणी करण्यात आली आहे " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " अकृषिक प्रयोजनासाठी करण्याची इच्छा असेल तर, किंवा " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" कलम ४२ च्या पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून, जर बिनदुमाला जमिनीच्या एखाद्या भोगवटादाराची किंवा दुमाला जमिनीच्या वरिष्ठ धारकाची किंवा अशा जमिनीच्या कुळाची,—

(अ) ज्या जमिनीची आकारणी करण्यात आली असेल किंवा जी शेतीच्या प्रयोजनासाठी धारण केलेली असेल तिचा अकृषिक प्रयोजनासाठी उपयोग करण्याची इच्छा असेल तर, किंवा ".

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ११७ ची सुधारणा.

**४.** उक्त संहितेच्या कलम ११७ मध्ये, खंड (५) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (५क) कलम ४२ च्या पोट-कलम (२) अन्वये नगरेतर क्षेत्रातील वैयक्तिक खऱ्याखुऱ्या निवासी प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या शेतजमिनी ; ".

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.